

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine April 2017 - Pages - 36

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

* पुणे * वर्ष ६८ वे * अंक ६ * एप्रिल २०१७ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




पुणे येथील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी
मेकॅनिकल इंजिनिअरिंगची शाखेची विद्यार्थिनी (सन २०१३)
कु. पूनम पाटील हिचा एमपीएससी परिक्षेमध्ये राज्यात मुलींमध्ये प्रथम क्रमांक आल्याबद्दल सत्कार करताना
संस्थेचे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, समवेत डावीकडून संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर,
कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अविनाश वळवडे, सौ. केतकी वळवडे, प्रा. सौ. पद्मजा जोशी व विद्यार्थी प्रतिनिधी

## ✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं), नाशिक ✻




सौ. शैलजा किशोर पाटील यांचा सेवापूर्ती समारंभानिमित्त सत्कार करताना संचालक श्री. अमोल जोशी व ग्रामस्थ श्री. गोपाळ दाते, श्री. सुधाकर दाते, श्री. किरण दाते, श्री. छगन भोईर, श्री. विलास पगार, श्री. देविदास पगार आणि श्री. निवृत्ती पगार




सौ. शैलजा किशोर पाटील यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करताना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत श्री. किशोर पाटील, श्री. राजेंद्र ढेरगे, ग्रामस्थ श्री. विलास पगार, श्री. देविदास पगार, श्री. गोपाळ दाते, आणि श्री. रामदास गायकवाड



## ✻ माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक ✻

शिक्षक श्री. शिवाजी राम माळी यांना इंडिपेंडन्स सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी रिसर्च युनियन तर्फे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल मा. दुर्गाताई तांबे (नगराध्यक्ष, अहमदनगर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे, मुंबई विद्यापीठ यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# संपादकीय आपली माणसे – त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारा

जगात सर्वगुणसंपन्न असा कोण आहे? अवतारी पुरुष म्हणून ज्यांना आपण मानतो असे श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्यामध्येही दोष होते ! जागतिक कीर्तीची महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यासारखी माणसेही सर्वस्वी निर्दोष नव्हती. प्रत्येक माणसात काही गुण आणि काही दोष हे असतात. गुणांचे आणि दोषांचे प्रमाण कमी अधिक असते एवढाच फरक.

गुणांच्या दृष्टीने सर्वस्वी परिपूर्ण अशी माणसे पाहाणारांची निराशाच होईल. आणि तसेच प्रत्येकाचे थोड्याफार प्रमाणात होते. आपल्या कुटुंबाचाच विचार करा. जन्म देणारे आई - बाप, सख्खे बहीण - भाऊ, संसारातील भागीदार आणि कुटुंबातील इतर माणसे - ही गुणांच्या दृष्टीने परिपूर्ण असावीत असे आपल्याला वाटते. आपण तशी अपेक्षा करतो आणि निराश होतो.

आता कुटुंबाबाहेरची माणसे पाहा. आपले लाबंचे नातेवाई, मित्रमंडळी, शेजारीपाजारी, व्यवसायातील सहकारी, ज्येष्ठ किंवा कनिष्ठ व्यक्ती, मालक आणि नोकर आणि अशाच तऱ्हेने नेहमी निकटसंबंध येणारी माणसे यांच्यातही कोणीच परिपूर्ण नसते. प्रत्येकात काही गुण आहेत, काही दोष आहेत.

आता तुमच्या स्वतःकडे पाहा. ''माझ्यात काय गुणदोष आहेत?'' असे स्वतःला विचारा; आत्मनिरीक्षण करा; जवळच्या माणसांना विचारा; आपण आपल्या पासून निराळेच आहोत अशा दृष्टीने आरशात पाहा. तुम्हाला लवकरच कळेल की आपल्यातही पुष्कळ गुणदोष आहेत. आपली पूर्वी कल्पना होती तितके गुणसंपन्न किंवा निर्दोष आपण स्वतः नाही.

अशा स्थितीत माणसाने काय करावे? घराचा त्याग करता येत नाही किंवा समाजाचा त्याग करुन हिमालयात जाऊन राहता येत नाही. आपले जग जसे आहे तसेच ते स्वीकारले पाहिजे. आपल्या माणसांचा त्यांच्या गुणदोषांसह स्वीकार करा. त्यातच खरी आपुलकी आणि खरे प्रेम आहे. उलटपक्षी तुमच्या गुणदोषांसह तुमचा स्वीकार करावा असे तुमच्या जवळच्या माणसांना तुम्ही सांगा. त्यामुळे परस्परांविषयी गैरवाजवी अपेक्षा राहाणार नाहीत. गुण-दोषांची जाणीव ठेवून, डोळे उघडे ठेवून क्षमाशील आणि उदार वृत्तीने वागा. गुणांचा गौरव करा, दोषांकडे डोळेझाक करा.

प्रत्येक मनुष्य उत्क्रांतीच्या एका पातळीवर जन्म घेतो आणि तेथून पुढे प्रगती करीत राहतो. कोणी जन्मतःच शान्त स्वभावाचे, क्षमाशील, विवेकसंपन्न, प्रेमळ, कष्टाळू, सहानुभूतिपूर्ण, परोपकारी वृत्तीचे असे असतात. जन्मतःच शीघ्रकोपी, संतापी, अविवेकी, सहानुभूतिशून्य, रुक्ष भावनेचे, सुखलोलुप, स्वार्थी असे जगात येतात. बहुसंख्य लोक या दोन्ही टोकांच्या मधल्या अवस्थेत कोठेतरी असतात.

मानवाचे अंतिम ध्येय शांती, दया, क्षमा, सहानुभूती, आत्मसंयम, प्रेम, उद्योगशीलता, विवेक, निःस्वार्थता अशा गुणांचा विकास करुन परिपूर्ण होणे हे आहे. त्या ध्येयाकडे वाटचाल करायचा तुम्ही स्वतः प्रयत्न करा, आणि आपल्या माणसांना त्या वाटेवर साहाय्य करा. आपल्या माणसांना, त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारून, तुम्ही उभयता परिपूर्ण आणि निर्दोष होण्याचा प्रयत्न करा.

**१९ एप्रिल १९६७ श्रीरामनवमी**

**समाचार अंकातून पुर्नमुद्रित**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

### इ. ९ वी पालक - शिक्षक सभा

इ. ९ वी च्या सर्व पालकांची सहविचार सभा दि. ८.२.२०१७ रोजी घेण्यात आली. या सभेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शाळेने राबवलेले उपक्रम तसेच विविध उपायांची माहिती प्रा. डॉ. टी. आर. गोराणे यांनी पालकांना दिली. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती, शालेय शिस्त, जादा तास या संदर्भात वर्गशिक्षक श्री. पाडुरंग गावडे व सौ. अरुणा सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पालक शिक्षक संघाचे सचिव श्री. नारायण रणदिवे व सहसचिव पर्यवेक्षक श्री. भागवल शेलार यांनीही मार्गदर्शन केले.

### ग्रंथोत्सव

पुणे जिल्हा परिषद व रावसाहेब पटवर्धन विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. १३.२.२०१७ ते १५.२.२०१७ पर्यंत ग्रंथोत्सावाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रा. डॉ. गोराणे व ग्रंथपाल श्री. बागुल हे उपस्थित होते. इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचा व सायबर गुन्हे विभागाच्या पोलिस अधिकारी सौ. स्वप्नाली शिंदे व श्री. संजय साळुंखे यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला. यावेळी अध्यापक श्री. नारायण रणदिवे, अध्यापिका सौ. भाईक, सौ. चोपडे व सेवक श्री. गोसावी उपस्थित होते.

### शिवजयंती उत्साहात साजरी

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डी. टी. आर. गोराणे यांनी शिवप्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी शिवचरित्रावर माहिती सांगितली. यावेळी आश्रमीय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिंदी निबंध स्पर्धा

हिंदी दिनाच्या निमित्ताने दि. १४ सप्टेंबर २०१६ रोजी आयोजित हिंदी निबंध स्पर्धेचा निकाल दि. २८ फेब्रुवारी २०१७ रोजी जाहीर झाला. विद्यालयामधील सर्व मुलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. प्रमुख पाहुणे मा. श्री. शामजी आगरवाल संपादक, 'आज का आनंद', पुणे यांचे शुभहस्ते गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन हिंदी अध्यापिका सौ. जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आंतरशालेय हिंदी निबंध स्पर्धेतील उत्कृष्ट निबंधांना प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र विद्यालयामधील तीन विद्यार्थ्यांच्या निबंधांना उत्कृष्ट निबंध पुरस्कार प्राप्त झाला. इ. ५ वी ६ वी गटामध्ये चि. अथर्व हेमंत राजपुरे (६ अ), इ. ७ वी ८ वी गटामध्ये चि. अनिकेत अनिल चांदिवडे, इ. ९ वी १० वी गटामध्ये चि. हर्षद सुधाकर गाडे (१० अ)

**यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन शिक्षिका सौ. जाधव व सौ. अरुणा सूर्यवंशी यांचे हार्दिक अभिनंदन !**

### जागतिक महिलादिन स्त्री भावविश्वाच्या गीतांमधून साजरा

प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे आणि सर्व शिक्षक सहकारी यांच्या नियोजनामधून बुधवार दि. ८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रम संपन्न झाला.

विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सक्रिय सहभाग नोंदवून महिलांच्या भावविश्वावर गीते सादर केली. प्रा. तुर्वनकर यांनी आपल्या गीतातून विश्वातील माऊलीच्या प्रती आदर व स्नेहभाव व्यक्त केला, तर डॉ. गोराणे यांनी स्वरचित अंधश्रद्धा निर्मूलन गीतातून महिला व विद्यार्थिनींचे प्रबोधन केले. त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या. श्री. बी. पी. सावळे यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले. सौ. डिके यांनी कवितेतून शुभेच्छा दिल्या, श्री. लाड यांनी शायरीतून सलामी देत

शुभेच्छा दिल्या.

सर्व शिक्षकांनी, महिला शिक्षिकांना व विद्यार्थिनींना गुलाबपुष्प देऊन सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. सौ. राजश्री कसबे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

**इ. ९ वी साठी गणिताच्या व्याख्यानाचे आयोजन**

संस्थेच्या १९१५ च्या माजी विद्यार्थ्यांच्या पाल्यांनी (श्री. मधूसूदन वामन भिडे, माहिम, मुंबई यांनी) विद्यालयातील इ. ९ वीच्या दोन्ही तुकडयांमधील १३४ विद्यार्थ्यांना दि.२१ व २२ मार्च असे दोन दिवस प्रत्येकी दीड तास गणित विषयाचे व्याख्यान दिले. गणितातील मुलभूत संकल्पना, गणिती क्रिया, सूत्रांचे उपयोग करून दाखविले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. आभारपत्र देऊन डॉ. गोराणे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

**'जीवन कौशल्यांवर' (Life Skills) व्याख्यान**

महाराष्ट्र अनिसच्या सक्रिय कार्यकर्त्या चित्रलेखा जेम्स यांनी पीपीटी शो द्वारे इ. ९ वीच्या १३४ विद्यार्थ्यांनी जीवन कौशल्यांच्या विकासासाठी तीन तास व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील विसंगती, विवेकवादी वर्तनाचे प्रसंग, जीव-निर्मिती, चमत्कार, प्रात्यक्षिके आणि विविध प्रकारे त्यांनी जीवनातील कौशल्ये, कारण - परिणाम यांचा उलगडा दृकश्राव्य माध्यमातून केला. विशेष म्हणजे त्यांचा मुलगाही त्यांना कामात मदत करत होता. विद्यार्थ्यांना त्याबाबत विशेष कौतुक वाटले. कार्यक्रमात शिक्षक सहभागी झाले होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी केले. आभारप्रदर्शन पर्यवेक्षक श्री. भागवत शेलार यांनी केले.

**बाह्यपरीक्षा विभाग**

महाराष्ट्र ज्ञानपीठ, मुंबई यांचेमार्फत घेण्यात आलेल्या गणित / इंग्रजी व चित्रकला या बाह्यपरीक्षांना आपल्या शाळेतील १२५ विद्यार्थी बसले होते. संबंधित विषय अध्यापिका सौ. प्राजक्ता भाईक व सौ.अरूणा सूर्यवंशी यांनी अनुक्रमे इंग्रजी, गणित व चित्रकला या विषयासाठी बहुमोल मार्गदर्शन केले. शालाबाह्य परीक्षांचा एक वेगळा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. याकामी महाराष्ट्र ज्ञानपीठाचे पुणे विभागाचे प्रतिनिधी अध्यापक श्री. नारायण रणदिवे व प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. ***

## निवेदन

## *महाराष्ट्र विद्यालय - माजी विद्यार्थी १९६६ बॅच*

### सुवर्ण महोत्सव स्नेह मेळावा

**पुणे विद्यार्थी गृहाच्या महाराष्ट्र विद्यालयाच्या १९६६ सालच्या एस. एस. सी. बँचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन संस्थेमध्ये दि. १२ मे २०१७ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत आयोजित केलेले आहे. १९६६ सालच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी अवश्य उपस्थित राहून संस्थेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातही त्याच दिवशी सायंकाळी ६.०० ते ७.०० या वेळात सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.**

श्री. सुधीर रघुवीर महाजनी    प्राचार्य हणमंत गणपती भोसले

संयोजन समिती

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**

**प्र. प्राचार्य : परमेश्वर. व्ही. शिंदे**

## रक्तदान शिबीराचे आयोजन

दिनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या सहाय्याने रक्तदान शिबीराचे आयोजन बुधवार दि. २ मार्च रोजी केले होते. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन एकूण ६३ जणांनी रक्तदान करुन शिबीर यशस्वी केले.

शिक्षक व सेवक यांनी रक्तदात्यांचे आभार मानले.

## मराठी राजभाषा दिन

संस्थेमध्ये जागतिक मराठी राजभाषा दिन दि. २७.२.२०१७ रोजी साजरा करण्यात आला. त्या अंतर्गत वर्गनिहाय प्रतिनिधींची मराठी भाषेवर प्रश्नमंजुषा, म्हणी पूर्ण करणे, इंग्रजी शब्दांचे मराठी भाषांतर करणे तसेच आयत्या वेळी दिलेल्या विषयावर शुध्द मराठी भाषेत विचार मांडणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये अंतिम वर्ष प्रिंटिंग मध्ये शिकत असलेले कु. मयुरी अरगडे व कु. किशोर भोपळे यांनी प्रथम पारितोषिक मिळविले. तसेच द्वितीय वर्षे इलेक्ट्रॉनिक्स मधील कु. अदित्य जोशी व कु. पूर्वा भोसले यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. कु. अथर्व दातार याने सूत्रसंचालन केले. या स्पर्धेसाठी श्री. एस. बी. सहास्रबुध्दे व सौ. प्रिती अ. पेठकर यांनी परीक्षकाचे काम केले. प्रा. अक्षय रावेतकर यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## जागतिक मुद्रण दिन

संस्थेमध्ये जागतिक मुद्रण दिन दि. २४.२.२०१७ रोजी साजरा करण्यात आला. या अंतर्गत अरिना ॲनिमेशन, टिळक रोड, पुणे यांच्यातर्फे प्रिंटिंग सॉफ्टवेअर या विषयावर प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अक्षय रावेतकर व श्री. तुषार कोंडे यांनी केले.

## वक्तृत्व स्पर्धा (एक्सटेंपर)

विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा यावा यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना आयत्यावेळी विषय देऊन त्या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| प्रथम | कु. अथर्व दातार | तृतीय वर्ष प्रिंटिंग |
| द्वितीय | कु. आदित्य जोशी | द्वितीय वर्ष इ. ॲण्ड टी. सी. |
| तृतीय | कु. वृषाली साळुंखे | तृतीय वर्ष प्रिंटिंग |

या स्पर्धेसाठी सौ. संध्या कुलकर्णी व श्री. महेंद्र खैरनार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## विविध गुणदर्शन

दरवर्षी प्रमाणेच या वर्षी सुध्दा विद्यार्थ्यांनी टाय डे, सारी डे, ट्रॅडिशनल डे, ब्लॅक ॲण्ड व्हाइट डे असे विविध डे साजरे केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती. काही विद्यार्थ्यांनी नकला, संवाद, कविता इ. विविध कलांचे सादरीकरण केले.

## शैक्षणिक भेट

इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग पदवीच्या विद्यार्थ्यांनी दि. ७ मार्च २०१७ रोजी आकांक्षा इलेक्ट्रॉनिक्स, एस. पी. इंटरप्रायजेस आणि ओंकार क्लास या कंपन्यांना शैक्षणिक भेट दिली व उपयुक्त माहिती मिळविली.

## विविध स्पर्धांमधील यश

पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या, पुणे तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे येथे झालेल्या विविध स्पर्धांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन पदविकेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी कु. पूर्वा भोसले व कु. मानसी पोखरण (द्वितीय वर्ष) यांनी टेक्निकल क्वीज मध्ये द्वितीय पारितोषिक मिळविले.

**संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !** ✻✻

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी, ता. जि. नाशिक

**संचालक : श्री. अमोल जोशी**

**प्राचार्य : श्री. अशोक नामदेव ढिवरे**

### ६८ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

६८ वा प्रजासत्ताक दिन विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस. पी. ठोंबरे यांनी केले. ध्वजारोहणाचे राष्ट्रीय कर्तव्य अध्यक्ष प्राचार्य अशोक ना. ढिवरे, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तळेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व इतर मान्यवरांनी पार पाडले.

विद्यार्थिनींच्या स्वागत गीतानंतर कॉपीमुक्त अभियान प्रतिज्ञेचे वाचन प्रा. जी. एस. जाधव यांनी केले. या प्रसंगी फेब्रुवारी - मार्च २०१७ मध्ये इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत कोणत्याही स्वरूपाची कॉपी करणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली.

भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा व सामान्यज्ञान परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांची पारितोषिके प्रा. सी. एम. गोऱ्हे यांनी घोषित केले. सुवर्ण, रौप्य व कास्य अशी पदके देऊन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना गौरविले. विविध परीक्षासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणाऱ्या **प्रा. पी. एस. सूर्यवंशी यांना 'उपक्रमशील शिक्षक' म्हणून या प्रसंगी गौरवण्यात आले.**

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष प्राचार्य अशोक ढिवरे यांनी प्रजासत्ताक दिनाविषयी भाषण केले. आभार प्रा. पी.एस. सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमास तळेगांवचे सरपंच, शिक्षक- पालक संघाचे अध्यक्ष - उपाध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर. एम. जगताप यांनी केले.

### विद्यालयातील खेळाडूंना धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त

स्व. मीनाताई ठाकरे स्टेडियम पंचवटी नाशिक येथे संपन्न झालेल्या पहिल्या राष्ट्रीय रूरल (ग्रामीण) ऑलिंपिक असोसिएशन स्पर्धेत दि. ११ ते १३ नोव्हेंबर २०१६ दरम्यान घेण्यात आलेल्या धावणे स्पर्धेत विद्यालयाची **धावपटू कु. रोहिणी निवृत्ती सोपनर या विद्यार्थिनीने १७ वर्षे वयोगटात ३००० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदक मिळविले.**

या स्पर्धेत भारतातून महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली, उत्तरप्रदेश, हरियाणा, तामिळनाडू, पाँडेचरी, आंध्रप्रदेश, छत्तीसगड या राज्यातील ४५० खेळाडूंनी भाग घेतला होता. ऑलिंपिक असोसिएशनचे तत्कालिन प्रमुख जे.पी.वर्मा या स्पर्धेला स्वतः उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंचे संचालक श्री. अमोल जोशी, प्राचार्य अशोक ढिवरे, पर्यवेक्षक श्री. ढेरगे तसेच शिक्षक व शिक्षकेतर बंधूंनी अभिनंदन केले. यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

### प्राचार्या सौ. शैलजा पाटील यांचा सेवापूर्ती समारंभ

विद्या प्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. शैलजा किशोर पाटील या नियत वयोमानानुसार दि. ३० नोव्हेंबर २०१६ रोजी ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त विद्यालय व संस्थेच्या वतीने सौ. शैलजा पाटील यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक श्री. अमोल जोशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपमुख्याध्यापक श्री. अशोक ना. ढिवरे यांनी भूषविले.

सदर कार्यक्रमात सौ. पाटील यांच्याविषयी त्यांचे माजी विद्यार्थी श्री. गोपाळराव दाते, श्री. सुधाकर दाते यांनी आपला शालेय जीवनातील आठवणींना उजाळा

देत ऋण व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने पर्यवेक्षक श्री. राजेंद्र ढेरगे व श्रीमती प्रिती रजपूत यांनी सौ. पाटील यांच्या कार्याचा गौरव करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने संचालक श्री. अमोल जोशी यांच्या शुभहस्ते सौ. शैलजा पाटील व श्री. किशोर पाटील यांचा 'स्मृतिचिन्ह' शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी बोलताना संचालक श्री. अमोल जोशी यांनी सौ. शैलजा पाटील यांच्या ३५ वर्षांच्या कारकीर्दिचा आढावा घेतला. त्यांनी तळेगांवसारख्या आदिवासी भागात अत्यल्प सुविधा असताना देखील दिलेल्या शैक्षणिक योगदानाबद्दल विद्यालय व संस्थेला सौ. शैलजा पाटील यांच्याबद्दल अभिमान असल्याचे सांगितले. त्यांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेने विद्यालयाचे पुढील प्राचार्य म्हणून श्री. अशोक नामदेव ढिवरे यांनी नियुक्ती केल्याचेही श्री. अमोल जोशी यांनी जाहीर केले व त्यांचे अभिनंदन केले.

श्री. अशोक ना. ढिवरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामधून आपल्या सेवाकाळात सौ. शैलजा पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्याचे नमूद केले. सत्काराला उत्तर देतांना भावविवश झालेल्या सौ. शैलजा पाटील यांनी आपल्या विद्यालयातील ३५ वर्षाच्या सेवाकाळात आलेल्या अनुभवाव्दारे विद्यार्थ्यांनी आपल्या पुढील आव्हानांना कसे सामोरे जावे याचे मार्गदर्शन केले. विद्यालय, संस्था, आजी - माजी विद्यार्थी, परिसरातील नागरिक यांचे अनमोल सहकार्य लाभल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. देविदास पद्मे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. एल. एम. चव्हाण यांनी केले. तर आभार श्री. गौरव झुरूडे यांनी मानले. सदर कार्यक्रमाला सौ. शैलजा पाटील यांचे कुटुंबीय, आजी - माजी विद्यार्थी, प्रतिष्ठीत नागरिक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

## शिवजयंती

विद्यालयाच्या प्रांगणात दि. १९.२.२०१७ रोजी शिवजयंती उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. सुदाम सूर्यवंशी आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या पराक्रमाच्या कथा सांगितल्या. इयत्ता ९ वी तील विद्यार्थ्यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार श्रीमती केकाण अर्चना यांनी केले.

## मराठी राजभाषा दिन

विद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन दि. २६.२.२०१७ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपशिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्याचा परिचय, त्यांच्या बरोबर अनुभवलेल्या प्रसंगाचे कथन करून मातृभाषेचे महत्व कथन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनीही मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मराठी भाषेचा अभिमान

बाळगावा असे सांगितले. मराठी दिनाच्या निमित्ताने विद्यालयात मराठी गीतगायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या. श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन दि. २८.२.२०१७ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, प्रमुख अतिथी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे व्याख्यात्या सौ. गायत्री बेंडाळे, श्री. योगेश मेतकर सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक आणि प्रमुख अतिथींचे हस्ते भौतिक शास्त्राचे नोबेल पुरस्कार प्राप्त चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. विज्ञान शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी शास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांचे बालपण, शिक्षण आणि संशोधन कार्याविषयी माहिती सांगितली. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यालयात विज्ञान, गणित, इंग्रजी, कार्यानुभव या विषयांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात विज्ञानातील शास्त्रज्ञांचे, छोटे छोटे प्रयोग सादरीकरण, विद्यार्थी शिक्षक निर्मित शैक्षणिक साधने, उपकरणे इ. चा समावेश होता. इ. ५ वी व इ. ६ वीच्या विद्यार्थिनींनी या प्रदर्शनात उत्साहाने सहभाग घेऊन सादरीकरण केले. इ. ७ वी व इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांनी गणित विषयाचे प्रदर्शनास १ ते १०० समसंख्या, विषमसंख्या कंपासपेटीतील साहित्य आलेख कागदावरील बिंदुचे रेखाटन इ. सादरीकरण केले. इ. ९ वी व इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी व्याकरणातील विविध सूत्रांद्वारे सादर केले. चित्रवर्णन, शब्दबाग आणि आकर्षक शैक्षणिक साधनांचे सादरीकरण केले. तसेच कार्यानुभव या विषयांतर्गत प्रदर्शनात कागदकाम, कोलाज काम, पक्ष्यांची आकर्षक चित्रे, मातीच्या वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शिवाजी माळी यांनी केले.

### आशीर्वाद समारंभ

विद्यालयात इ. १० वी चा आशीर्वाद समारंभ दि.१.३.२०१७ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. प्रभाकर दुसाने, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वतीपूजन संपन्न झाले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत आणि सत्कार केला. इ. १० वीतील विद्यार्थी चि.आदित्य पगारे चि.सुरज दोडके, चि. परमल जाधव यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनातील भावपूर्ण अनुभव कथन केले. प्रमुख अतिथी आणि मुख्याध्यापक यांनीही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शभेच्छा दिल्या. विद्यालयातील उपशिक्षक श्री. शिवाजी माळी, श्रीमती सुनंदा ठाकरे, श्रीमती अर्चना केकाण यांनी उद्‌बोधनपर भाषणे केली. या कार्यक्रमप्रसंगी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी 'श्री सरस्वती देवीची मूर्ती' विद्यालयास भेट दिली. चि. आदित्य पगारे या विद्यार्थ्याने आभार मानले. चि. अनुराग जाधव याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### जागतिक महिला दिन

विद्यालयाच्या प्रांगणात जागतिक महिला दिन दि. ८.३.२०१७ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. श्रीकृष्ण आवारे केंद्रप्रमुख क्र. २ विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते आदर्श शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि विद्येचे आराध्य दैवत श्री सरस्वतीदेवीच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या स्वागत आणि सत्कार समारंभानंतर उपशिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी स्त्रीयांचे विविध क्षेत्रातील योगदान स्पष्ट केले. श्री. श्रीकृष्ण आवारे यांनीही आपल्या मनोगतातून

स्त्रीयांचा सन्मान करावा असे सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पौराणिक काळापासून ते आधुनिक काळातील स्त्रीयांची शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक क्षेत्रातील कामगिरी कथन केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शिवाजी माळी यांनी केले. श्री.तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन दि.१०.३.२०१७ रोजी विद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सावित्रीबाई फुलेंच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची माहिती सांगून विविध प्रेरक अनुभव कथन केले. श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले.

### पर्यावरण पूरक होळी

विद्यालयात पर्यावरण पूरक होळी कार्यक्रम दि. ११.३.२०१७ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी होळी या सणाचे पौराणिक, भौगोलिक महत्व सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पर्यावरण पूरक होळी, नैसर्गिक रंग, पाण्याच्या काटकसरीने वापर करून होळी साजरी करावी असे सांगितले. श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले.

### अभिनंदनीय

**विद्यालयातील शिक्षक श्री. शिवाजी रामा माळी यांना इंडिपेडन्स सेकंडरी ॲन्ड हायर सेकंडरी रिसर्च युनियन तर्फे सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल मा. दुर्गाताई तांबे (नगराध्यक्षा, अहमदनगर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे मुंबई विद्यापीठ यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.**

विद्यालयातील उपशिक्षिका **श्रीमती सुनंदा ठाकरे यांना जिव्हाळा बहुउद्देशिय संस्था नाशिक तर्फे शैक्षणिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल 'राष्ट्रीय समाजरत्न' पुरस्काराने स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. तसेच त्यांना सार्वजनिक वाचनालय नाशिक परिसर वृत्तलेखक संघ, रेषमाई महिला विकास संस्था, तुलसी सामाजिक संस्था, शिक्षक सेना, सातपूर वसंत व्याख्यानमाला ई. टी. व्ही. चॅनेल तर्फे स्त्री कलाकार, नाशिक आकाशवाणी वर नभोनाटयवाचन कलावंत, वरील संस्थांचे वतीने गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.** पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. शिवाजी माळी आणि श्रीमती सुनंदा ठाकरे यांना पुणे विद्यार्थी गृह संस्था आणि विद्यालयाचे वतीने शुभेच्छा आणि अभिनंदन ! ❊❊

## भावपूर्ण श्रध्दांजली

पुणे विद्यार्थी गृहाचे कै. काकासाहेब देशमुख विद्यालयाच्या माजी उपशिक्षिका श्रीमती विजया विष्णु देशपांडे यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी दि.१४.१.२०१७ रोजी (मकर संक्रात) रोजी नाशिक येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांनी विद्यालयात २३ वर्षे सेवा केली. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुणे विद्यार्थी गृह संस्था आणि विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहेत.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरःशांती देवो ! ❊❊❊

# श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**संचालक : श्री. संजय गुंजाळ** **प्राचार्य : डॉ. एन. एच. रौंदळ**

## पोलिस रायझिंग डे

महाविद्यालयात पोलिस रायझिंग डे बुधवार दि. ४.१.२०१७ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी पोलिसांशी संवाद साधला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून म्हसरूळ पोलिस ठाण्याचे सह. पोलिस निरीक्षक श्री. शार्दुल साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. एच. रौंदळ होते. श्री. शार्दुल साहेब यांनी यावेळी विद्यार्थ्यांना कायदेशीर बाबींची माहिती करून दिली. जसे दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट घालणे, चारचाकी वाहन चालविताना सिटबेल्ट बांधणे अशा बऱ्याच घटकांची माहिती स्पष्ट केली, आणि विद्यार्थ्यांच्या मनातील शंकेचे निरसन केले. पोलिसांविषयी असणारी भीती दूर केली. पोलिस आपले मित्र आहेत हे पटवून दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनोद राऊत यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमर ठोंबरे यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. मंजुषा थोरात यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. विलास लवांड व सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## जन्मदरातील लिंग गुणोत्तराच्या असमानतेचे सामजिक परिणाम कार्यशाळा

शनिवार दि. १७ डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये जन्मदरातील लिंग गुणोत्तराच्या असमानतेचे सामाजिक परिणाम कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेस प्रमुख अतिथी सिडको कॉलेज नाशिकचे, डॉ. दिलीप शिंदे, प्रा. डॉ. पताडे, प्रा. डॉ. आर. एस. निकम तसेच संचालक श्री. एस. एन. गुंजाळ, प्रा. डॉ. एन. एच. रौंदळ, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. विलास लवांड, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राची सुरूवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. विलास लवांड यांनी केले. मान्यवर अतिथींचा परिचय व कार्यशाळेच्या विषयाचा आशय प्रा. डॉ. एन. एच. रौंदळ यांनी स्पष्ट केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. दिलीप शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना, देशात एकूण लोकसंख्या दरहजार पुरूषामागे किती स्त्रिया आहेत त्या प्रमाणाला स्त्री पुरूष प्रमाण असे म्हणतात, असे सांगितले. अमेरिका, युरोप, रशिया, जपान इ. देशात पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते. या उलट ऑस्ट्रेलिया, कॅनडा, भारत इ. देशात स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. भारतात दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे याची कारणे अतिशय व्यवस्थितपणे विद्यार्थ्यांना डॉ. दिलीप शिंदे यांनी करून दिली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राची सुरूवात प्रा. डॉ. पताडे, यांनी जन्मदरातील लिंग गुणोत्तराच्या असमानतेचे सामाजिक परिणामाची कारणे काय आहेत? यावर मार्गदर्शन केले. निसर्ग नियमाने स्त्री पुरूष प्रमाण समान असायला हवे परंतु आर्थिक परिस्थिती आणि स्त्रीचे समाजातील स्थान या घटकांमुळे स्त्री पुरूष विषमता निर्माण झाली आहे. भारतात दर १०० पुरूषामागे १०८ स्त्रिया जन्माला येतात. परंतु जन्मानंतर पुरेसे लक्ष दिले जात नाही ही परिस्थिती आहे.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या आणि अंतिम सत्रात प्रा. विनोद राऊत यांनी जन्मदरातील लिंग गुणोत्तर

तसेच लिंग विकास दर व लिंग सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. कोणत्या देशात लिंग गुणोत्तर समान व असमान याचे संपूर्ण विश्लेषण आकडेवारी व्दारे त्यांनी सविस्तर स्पष्ट केले. भारतातील रूढी परंपरेचा कशा प्रकारे लिंग गुणोत्तरावर परिणाम होतो? याविषयी वेगवेगळे दाखले त्यांनी दिले.

वरील तीन सत्रात कार्यशाळा संपन्न झाली. शेवटच्या सत्रात विद्यार्थ्यांचे मनातील प्रश्नांचे निरसन करण्यात आले. प्रा. संतोष आढाव यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन तृतीय वर्ष कला शाखेची विद्यार्थिनी कु. पूजा देशमुख हिने केले. एक दिवसीय कार्यशाळा संपन्न होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कमवा व शिका या योजनेच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दि. १७.२.२०१७ रोजी विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मान्यवर प्रा. डॉ. वेदश्री थिगळे, त्र्यंबक महाविद्यालय यांनी केले. या प्रसंगी संचालक श्री. संजय गुंजाळ, प्रा. डॉ. एन. एच. रौंदळ, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा.विलास लवांड तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**प्रथम सत्र -** या सत्रात प्रा. डॉ. वेदश्री थिगळे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना स्त्रियांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी, समस्या या कशा निर्माण होऊ शकतात? यासाठी मोबाईल, इंटरनेट याचा वापर अतिशय काळजीपूर्वक केला पाहिजे. विद्यार्थिनींच्या जीवनात येणाऱ्या अडचणी भरपूर असून त्याला सामोरे कसे जायला पाहिजे? यातून मार्ग कसे काढले पाहिजे इ. गोष्टींवर मार्गदर्शन केले.

आपल्या कर्तृत्वाने व आपल्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांच्या आधारे येणाऱ्या समस्यांवर मात करून गगनभरारी मारण्याची जिद्द ठेवा इ. विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

**व्दितीय सत्र -** या सत्रात प्रा. मिनल जाधव यांनी विद्यार्थिनींशी हितगुज साधले. शारीरिक व मानसिक समस्यांची उत्पत्ती ही आजच्या धकाधकीच्या जीवनामुळे होते. तणावमुक्ती या विषयावर त्यांनी प्रभावी विचार व्यक्त केले. तसेच चर्चात्मक माध्यमातून विद्यार्थिनींच्या सर्व शारीरिक व मानसिक समस्यांचे निराकरण केले.

**तृतीय सत्र -** या सत्रात प्रा. मंजुषा थोरात यांनी विद्यार्थिनींशी हितगुज केले. विद्यार्थिनींना कार्यक्षेत्र व शिक्षणात आलेले विविध प्रसंग त्यांनी सांगितले. या जीवनात येणाऱ्या कठीण प्रसंगी कसे सामोरे जायचे? या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभदा सिंगदकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. पूजा देशमुख हिने केले. या कार्यशाळेस विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

### जागतिक तापमान वाढ कार्यशाळा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळ अंर्तगत श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य व कला महाविद्यालय म्हसरूळ नाशिक या ठिकाणी दि. २५.१.२०१७ रोजी कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन व प्रमुख अतिथी प्रा. किशोर पवार यांनी केले. यावेळी संचालक श्री. संजय गुंजाळ, प्रा. डॉ. एन. एच. रौंदळ, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. विलास लवांड, महाविद्यालयातीचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. सदरची कार्यशाळा ३ सत्रात संपन्न झाली.

**प्रथम सत्र -** पहिल्या सत्रात प्रा. डॉ. किशोर पवार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. जागतिक तापमान वाढ किती वेगाने होत आहे? त्याचे परिणाम येणाऱ्या दिवसात किती परिणामकारक ठरणार आहे. कार्बन डायऑक्साईड मध्ये होणारी वाढ,

ओझोन थराचा होणारा क्षय, मानवाच्या नैसर्गिक घटकांमध्ये होणारा हस्तक्षेप हेच प्रमुख कारण आहे. जागतिक तापमानामध्ये वाढ होण्यास कारणीभूत असलेल्या विविध कारणांची उदाहरणे देऊन डॉ. पवार यांनी तापमान वाढ होण्याची कारणे स्पष्ट केली.

**दुसरे सत्र -** या सत्रात प्रा. धन्वंतरी देशमुख यांनी विद्यार्थिनींशी हितगुज साधले. त्यांनी LCD Projector च्या माध्यमातून जागतिक तापमान वाढीचा परिणाम मानव, प्राणी व वनस्पती जीवनावर कसा होतो? हे सांगितले. यामुळे मानवाचे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत तसेच तापमान वाढीमुळे काही प्राणी व वनस्पतींच्या प्रजाती नष्ट / नामशेष होत आहेत हे उदाहरण देऊन स्पष्ट केले.

**तिसरे सत्र -** प्रा. मंजुषा थोरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना निसर्ग हा अनमोल असून नैसर्गिक घटकांचा वापर काळजीपूर्वक करावा. जगातील स्पर्धा मोठया प्रमाणात वाढली असून प्रत्येक देश आज प्रगती करतांना नैसर्गिक घटकांचा वापर मोठया प्रमाणात करत आहे. वाढते औद्योगिकरणामुळे लोकांची बदललेली जीवन शैली अशा विविध कारणांमुळे नैसर्गिक समतोल बिघडला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाची सांगता अध्यक्षीय भाषणाने करण्यात आली. अध्यक्षीय भाषणाने प्राचार्य डॉ. एन. एच. रौंदळ यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.विलास लवांड यांनी केले. ***

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**
**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ**

### महापौर चषक स्पर्धा २०१६-१७

नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा विभाग आयोजित महापौर चषक बुध्दिबळ स्पर्धा दि. ११ व १२ जानेवारी २०१७ रोजी श्रीराम विद्यालय, ऐरोली मध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये १२०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. आपल्या विद्यालयामधून ९६ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. **यामध्ये माध्यमिक इंग्रजीची विद्यार्थिनी कु. वैष्णवी किशोर गोळे हिने उज्वल कामगिरी करत प्रथम दहा मध्ये सहावा क्रमांक प्राप्त केला.** या स्पर्धेमध्ये शिक्षक श्री. सुहास राऊळ यांनीही खुल्या गटामध्ये सहभाग नोंदवला.

### बालसभा

दि. ३१ जानेवारी रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांची बालसभा आयोजित करण्यात आली. या सभेस इ. ५वी ते १०वी च्या रेड हाऊसच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, समाज प्रबोधन नाटिका व कवितांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.९वी च्या विद्यार्थ्यांनी केले.

### अभिनंदन वार्ता

दि.७ व ९ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालयातर्फे कै. यशोदाबाई साने यांच्या स्मृतिशताब्दी निमित्त विविध शैक्षणिक स्पर्धा घेण्यात आल्या. या आंतरशालेय स्पर्धेत निबंध स्पर्धेत व अभिवाचन स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| स्पर्धा | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | क्रमांक |
|---|---|---|---|
| निबंध | कु. साईप्रसाद कळंबे | ८वी | प्रथम |
| | कु.छाया शिंदे | ८वी | द्वितीय |
| अभिवाचन | कु. अभय फंड | ९वी | प्रथम |
| | कु. ग्लाविटा मॅन्डोसा | ९वी | द्वितीय |

### प्रेरणादायी व्याख्यान

दि.१८ फेब्रुवारी २०१७ रोजी माध्यमिक इंग्रजीच्या इ.५वी व इ.८वीच्या स्कॉलरशिपच्या

विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पुणे विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी श्री सागर भानवसे (विक्रीकर निरीक्षक) यांना आमंत्रित करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना त्यांचा परिचय करुन दिला. श्री. सागर भानवसे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचा अभ्यास कसा करावा? वेळेचे नियोजन तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी ही स्कॉलरशीपच्या सरावातूनच होते, याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

**वेदिक मॅथ्स मार्गदर्शन**

दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ८ ते १०.३० वेळेत इ. ७वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वेदिक मॅथ्स या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. श्री. सुनिल शर्मा यांनी सोप्या प्रकारे गणित सोडवण्याच्या विविध कार्यपध्दती समजावून सांगितल्या. खूपच उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला.

**आंतरशालेय नृत्य स्पर्धा**

दि. १८ जानेवारी रोजी बेलापूरच्या विद्या उत्कर्ष मंडळातर्फे आंतर शालेय नृत्य स्पर्धा विद्या प्रसारक हायस्कूलच्या प्रांगणात पार पडल्या. या नृत्य स्पर्धेला नवी मुंबईतील २४ शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. माध्यमिक विभागातून विद्याभवन माध्यमिक इंग्रजीच्या इ. ८वी च्या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकावला.

**व्याकरण विषयावर आधारित व्याख्यान**

दि. २० फेब्रुवारी रोजी माध्यमिक इंग्रजीच्या इ. ८वी च्या स्कॉलरशिपच्या विद्यार्थ्यांसाठी व २४ फेब्रुवारी रोजी इ.१०वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व्याकरण विषयाअंतर्गत मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी सौ. गीतांजली अंबुलकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सौ. गीतांजली यांनी इंग्रजी व्याकरण अतिशय सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवले. इ. १० वीच्या विद्यार्थ्यांशी मुक्त संवादाद्वारे विविध शंकाचे निरसन केले.

## प्राथमिक इंग्रजी
## मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक

**अभिनंदनीय - आंतरशालेय नृत्य स्पर्धा**

दि. १९ फेब्रुवारी रोजी बेलापूरच्या विद्या उत्कर्ष मंडळातर्फे आंतरशालेय नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या नृत्य स्पर्धेला नवी मुंबईतील २४ शाळामधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्राथमिक विभागातून विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाने शेतकरी जीवनावर आधारित लोकनृत्य सादर केले होते व त्यात त्यांनी **प्रथम क्रमांक** पटकावला.

**बालसभा**

दि. २५ फेब्रुवारी २०१७ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांची बालसभा आयोजित करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक व सौ. साधना कुलश्रेष्ठ यांच्या उपस्थितीत ही सभा संपन्न झाली. या बालसभेत इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्यांचे, कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यलो हाऊसचा कर्णधार कुमार महेश चटीयार याने केले.

## प्राथमिक मराठी
## मुख्याध्यापिका सौ सुवर्णा मिसाळ

**श्यामची आई स्पर्धा**

दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजी नेरुळ ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालय कै. यशोदाबाई साने स्मृतिदिन शताब्दीनितित्त आयोजित आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धेमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या खालील विद्यार्थिनींनी सुयश संपादन केले.

| यशस्वी विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|
| कु. अविष्का गणेश महाकाळ | प्रथम |
| कु. श्रुतिका गोरखनाथ पाटील | द्वितीय |

**कराटे स्पर्धा अभिनंदनीय**

दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी पुणे येथे

इन्व्हायटेशनल स्टेट कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुयश संपादित केले.

| **यशस्वी विद्यार्थ्यांची नावे** | **इयत्ता** | **पदक** |
|---|---|---|
| कु. वेदांत अमृत घाडगे | इ. ३ री | सुवर्ण |
| कु. अथर्व सुरेश सावंत | इ. ५ वी | रौप्य |
| कु. मनस्वी मंगेश कांबळे | इ. ७ वी | कांस्य |

### आंतरशालेय नृत्य स्पर्धा

दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्याप्रसारक शाळा, बेलापूर येथे घेण्यात आलेल्या आंतरशालेय नृत्य स्पर्धेमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी **द्वितीय क्रमांक** मिळविला त्यामध्ये विद्यार्थ्यांना **रोख रक्कम बक्षीस, प्रमाणपत्र व शाळेला चषक मिळाला.**

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदशन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन !**

### मराठी राजभाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाने मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री संतोष जाधव (वृत्तलेखक, पत्रकार लोकसत्ता) हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते मराठी ग्रंथ दिंडीचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांनी प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मराठी दिनाचे औचित्य साधून इ. ५वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी मायबोलीचे वर्णन व प्रशंसा करणारी गीते सादर केली. तसेच ७ वीच्या विद्यार्थिनी कु. अविष्का महाकाळ व कु. अनुष्का महाकाळ या भगिनींनी आपल्याकडील काही पुस्तके शाळेच्या ग्रंथालयाला भेट म्हणून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख अतिथी श्री. संतोष जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, विद्याभवन मराठी शाळेमध्ये ज्या पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश घेतला आहे. त्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तसेच प्रत्येक मराठी व्यक्तीला मराठी भाषेचा नेहमीच अभिमान वाटला पाहिजे आणि मराठीचे कौतुक आपल्या घरातून व्हायला पाहिजे, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी मराठी ग्रंथ दिंडीची नेरुळ नगरातून फेरी काढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहशिक्षिका श्रीमती नूतन गवांदे यांनी केले.

### विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाने विज्ञान दिन उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमासाठी दै. सकाळ जाहिरात विभागाचे मुख्य व्यवस्थापक श्री. श्रीनिवास खांगटे, शांताश्री एज्युकेशनल ॲकॅडमीचे संचालक श्री. प्रणय चव्हाण, संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. विजया गणेश उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सकाळ जाहिरात विभागाचे मुख्य व्यवस्थापक श्री. निवास खांगटे यांचे संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी तुळशीवृंदावन भेट देऊन स्वागत केले. श्रीनिवास खांगटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, मुलांमुळे पालक व समाजात चांगला संदेश जाईल. प्लॉस्टिकमुक्तीने मुलांचे भवितव्य उज्ज्वल होण्यास मदत होईल. संचालक श्री. दिनेश मिसाळ म्हणाले की, सकाळ माध्यम समूहाचे संस्थापक डॉ. ना. भि. परुळेकर आणि कापडी पिशव्यांचे वाटप करणारे श्री. प्रणय चव्हाण हे दोघेही पुणे विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी आहेत. तसेच पर्यावरण जपण्यासाठी प्लॉस्टिकला हद्दपार केले पाहिजे. कार्यक्रमादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. विज्ञान दिनाचे औचित्य साधून इ. ३री ते ७वी विद्यार्थ्यांनी विविध विज्ञानाचे प्रकल्प बनवून आणले होते. विज्ञान प्रकल्पांचे परीक्षक म्हणून श्री. प्रणय चव्हाण यांनी काम पाहिले. इ. ३री ते ७वीच्या प्रत्येक वर्गातून तीन विजेत्याची नावे काढली गेली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कविता तेंडूलकर यांनी केले.

***

# पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी महामंडळ.

## ५ वे माजी विद्यार्थी महासम्मेलन

### आयोजक सर्व पदाधिकारी व सदस्य, पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई

### शनिवार दि. २२ एप्रिल २०१७ व रविवार दि.२३ एप्रिल २०१७

स्थळ - पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन प्रशाला, प्लॉट नं.३२, सेक्टर १८, नेरुळ (पश्चिम), नवी मुंबई ४०० ७०६.

प्रिय माजी विद्यार्थी बंधू / भगिनी,
स.न.वि.वि.

पुणे विद्यार्थी गृहाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन शनिवार दि. २२.४.२०१७ व रविवार दि. २३.४.२०१७ रोजी नेरुळ, नवी मुंबई येथे आयोजित केले आहे. सर्व मा. वि. बंधूंनी आपल्या मित्रांसह या संमेलनास शनिवारी दि. २२ एप्रिल २०१७ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत नेरुळला पोहचावे, ही विनंती.

**✼ कार्यक्रम ✼**

**शनिवार दि. २२ एप्रिल २०१७**

| | |
|---|---|
| ✼ शनिवार दुपारी २.०० | स्वागत (बाहेर गावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजनाची व्यवस्था असेल) इतरांसाठी चहा - अल्पोपहार |
| ✼ दु. ३.०० | विद्याभवन नेरुळ पहाणी. |
| ✼ दु. ३.३० ते ६.०० | नेरुळ दर्शन (मंदिरे, महाविद्यालये, बागा व महानगरपालिका) |
| ✼ साय. ६.३० ते ८.०० | माजी विद्यार्थी चर्चासत्र १ विषय - माजी विद्यार्थ्यांना संघटनेत आकृष्ट कसे करता येईल ? |
| ✼ रात्री ८.०० ते ९.३० | विद्याभवन विद्यार्थ्यांचा व अन्य माजी विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा मनोरंजनाचा कार्यक्रम. इच्छुक माजी विद्यार्थ्यांनी आपली नावे श्री. दिनेश मिसाळ यांचेकडे नोंदवावीत. |
| ✼ रात्री ९.३० | भोजन व विश्रांती. |

**रविवार दि.२३ एप्रिल २०१७**

| | |
|---|---|
| ✼ रविवार स. ८.३० ते ९.३० | चहा-नाश्ता |
| ✼ स. १० ते १२.३० | शैक्षणिक परिसंवाद विषय :- 'महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती कायदा १९८१ : संबंधितांच्या जबाबदाऱ्या समस्या, व उपाय' अध्यक्ष मा. श्री. रमेश शि. चव्हाण (अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका) वक्ते मा. श्री. संदीप संगवे, (शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका), सौ. प्राची साठे (शिक्षणमंत्र्यांच्या सचिव) शिक्षक आमदार श्री. बाळाराम पाटील, श्री. विजय बहाळकर, व श्री. ज्ञानेश्वर कानडे |
| ✼ दु. १२.३० ते १.३० | भोजन |
| ✼ दु. १.३० ते ३.३० | मुक्ताबाई फणसे शिष्यवृत्त्यांचे वाटप, निबंध स्पर्धा व अध्यापक वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण. |
| ✼ दु. ३.३० ते ४.३० | समारोप. |
| ✼ दु. ४.३० ते ५.०० | चहापान व निरोप. |

**आपण या स्नेहसंमेलनाला आपल्या मित्रांसह अवश्य यावे, ही विनंती. संमेलन वर्गणी रु. ३००/-**

आपले,

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. दिनेश मिसाळ | डॉ. शं. पां. किंजवडेकर | श्री. राजेंद्र बोऱ्हाडे | प्रा. कृ. ना. शिरकांडे |
| सहसचिव | महासचिव | समन्वयक | अध्यक्ष |
| (मो.९५९४२५५९२७) | (मो. ९८२०६३९७०३) | (मो. ९६१९७२२०२३) | (मो.९८१९१२२००१) |

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.२.२०१७ ते २८.२.२०१७**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

### देणगी रु.१०,०००/- वरील सर्व

**डॉ. सुरेखा उमाकांत शहा द्वारा - श्री. सुनिल रजनीकांत मेहता, पुणे देणगी रु.१,००,०००/-**

डॉ. सुरेखा उमाकांत शहा द्वारा - श्री. सुनिल रजनीकांत मेहता यांनी दि.२४.२.२०१७ रोजी रु.१,००,०००/- ची देणगी आजोबा स्व. श्री. हिरालाल अंबालाल मेहता (१७ फेब्रुवारी) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी १७ फेब्रुवारी रोजी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्रीमती शैलजा सदाशिव मोडक द्वारा श्री. सुनिल सदाशिव मोडक, कल्याण देणगी रु.३०,०००/-**

श्रीमती शैलजा सदाशिव मोडक द्वारा श्री. सुनिल सदाशिव मोडक यांनी दि.२८.२.२०१७ रोजी रु. ३०,०००/- ची देणगी पती कै. सदाशिव नारायण मोडक (मा. वि.)(फाल्गुन वद्य १४) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी रू. २०,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न तसेच रू.१०,०००/- च्या व्याजाचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल.

**डॉ. सुधीर बा. राईलकर, मुंबई**
**देणगी रू.२५,०००/-**

डॉ. सुधीर बा. राईलकर यांनी दि.२२.२.२०१७ रोजी रु. २५,०००/- देणगी मातोश्री कै. सुमन बाळकृष्ण राईलकर यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीच्या व्याजाचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. नंदकिशोर विष्णू ब्रह्मे, पुणे**
**देणगी रू.१२,५०१/-**

श्री. नंदकिशोर विष्णू ब्रह्मे यांनी दि.१५.२.२०१७ रोजी रु. १२,५०१/- ची देणगी कै. विष्णू पंढरीनाथ ब्रहमे यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. देणगी रु. १०,०००/- वरील व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी माघ वद्य ७ व भाद्रपद वद्य ७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी करण्यात येईल. तसेच रू. २,५०१/- च्या देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्री.विश्वास दत्तात्रेय भांबुरकर, पुणे**
**देणगी रू.१२,०००/-**

